# प्रकरण ४

## राजाराम महाराजांच्या सामाजिक व राजकीय सुधारणा

छत्रपती राजाराम महाराजानी आपल्या राज्य कारभाराची ध्येय धोरणे, ही सामान्य जनतेचा अभ्युदय व्हावा, त्यांना राजकीय हक्क प्राप्त व्हावेत व समाजातील विषमता नष्ट होऊन समाज एकजीनसी तयार व्हावा यासाठीच आखलेली होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केलेले समाजसुधारणेचे काम त्यांच्या अकाली निधनामुळे अपूरे राहिले होते. त्यांनी घेतलेल्या महत्वपूर्ण अशा निर्णयांची व आदेशांची अंमलबजावणी अपूर्ण राहिलेली होती. या पार्श्वभूमीवर राजाराम महाराजांचे कार्य महत्वाचे ठरते. त्यांनी शाहू महाराजांनी समाज परिवर्तनासाठी सुरु केलेल्या सर्व कायद्यांची योग्य ती अंमलबजावणी केली व राज्यात कांही नवीन कायदे लागू केले. समाज सुधारण्याच्या बाबतीत दक्ष राहून कोल्हापूर संस्थानात अनेक सामाजिक सुधारणा केल्या व राजाराम महाराजांनी प्रजेला राजकीय सुधारणाही दिल्या त्यामुळे प्रजेला राज्यकारभाराचे ज्ञान मिळू लागले व कार्यक्षम व जबाबदार असे नागरिक कोल्हापूर संस्थानात तयार होऊ लागले. म्हणून राजाराम महाराजांनी सुरु केलेल्या सामाजिक व राजकीय सुधारणांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सुरु केलेले कायदे व सुधारणा खालील प्रमाणे आहेत.

### १. बालविवाह प्रतिबंधक कायदा:

११ जून १९२९ पासून कोल्हापूर संस्थानात हा कायदा लागू करण्यात आला.[१] बालविवाह बंद करावेत ही मागणी सामाजिक

चळवळीत कार्य करणाऱ्या संघटनांनी केली होती व त्याप्रमाणे प्रचार ही सुरु होता. परंतु प्रत्यक्ष कायदा केल्यामुळे कोल्हापूर संस्थानात बालविवाह करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. या कायद्याचे नाव बालविवाह प्रतिबंधक कायदा असे असून त्यातील काही प्रमुख कलमे खालील प्रमाणे होती.

१. हा कायदा कोल्हापूर संस्थानातील सर्व धर्माच्या व सर्व जातींच्या प्रजाजनांना लागू आहे.

२. मुलीचे वय पूर्ण १२ वर्षे व मुलाचे वय पूर्ण १६ वर्षे असे असेल तरच विवाह कायदेशिर ठरेल.

३. जो कोणी स्त्री अगर पुरुष या कायद्याने गुन्हा ठरविण्यात आलेले कृत्य करेल त्यास रु. २000 पर्यंत दंड किंवा इंडियन पिनल कोड कलम १0७ प्रमाणे शिक्षेची तरतूद करण्यात येईल.

अशा प्रकारे कडक शिक्षेची तरतूद केलेला हा कायदा होता. शिवाय या कायद्याची अंबलबजावणी योग्यरीतीने व्हावी म्हणून करवीर गॅझेट मधून वेळोवेळी निरनिराळे आदेश प्रसिध्द केल्याचे दिसून येते. करवीर गॅझेट जाहिरनामा नंबर १९, तारीख ६ जुलै १९२६, मधून असे प्रसिध्द केले होते की --

"जी व्यक्ती बालविवाहासंबंधात माहिती देईल व त्याची माहिती खरी ठरली तर त्यास बक्षीस देण्यात येईल."[२]

तसेच या कायद्याची अंमलबजावणी करीत असता संस्थानच्या असे लक्षात आले की गावातील गावकामगार पोलीसपाटील हे बालविवाह प्रतिबंध कायद्याखाली घडलेल्या गुन्हयाची नोंद ठेवीत नसत व त्या

पध्दतीची खबरही देत नसत. परंतु अशा प्रकारचे गुन्हे निनावी अर्जावरुन उघडकीस येऊ लागल्यामुळे दरबारने प्रत्येक गावच्या पोलीस पाटलास एक विशिष्ट नमुन्यातील रजिस्टर देऊन त्या रजिस्टरमध्ये विचारलेली माहिती नियमित भरली पाहिजे असा दंडक घातला व भरलेल्या माहितीचा उतारा दरमहिन्याच्या पाच तारखेच्या आत पेट्याचे पोलीस सब्इन्स्पेक्टर यांच्याकडे पाठवावा असा ज्युडिशियल ऑर्डर नंबर १२१ ता. ५/१०-१९३२ ने ठराव करण्यात आला व जर कसूर झाल्यास पोलीस पाटलास जबाबदार धरण्यात येईल असा आदेश काढला.[३] या कायद्यामुळे व त्याच्या चोख अंमलबजावणीमुळे संस्थानात बालविवाहास प्रतीबंध झालेला दिसून येतो.

## २. शेतक-याची स्थीती सुधारण्याचे प्रयत्न:

राजाराम महाराज हे स्वत: शेती विषयाचे अभ्यासक होते. त्यानी शेतक-यांची स्थीती सुधारावी यासाठी कोल्हापूर संस्थानात काही जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले दिसून येतात. आधुनिक पध्दतीने शेतक-यानी शेती करावी यासाठी प्रचार मोहिम सुरु केली. लोखंडी नांगर कमी भाड्याने उपलब्ध करुन दिले. तसेच दरबार खर्चाने ३०० शेतक-याना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन केले त्यात किटकनाशके व बुरशी इत्यादी विषयावर माहिती दिली.[४] त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थी अग्रीकल्चर कॉलेजला शिक्षण घेण्यासाठी पाठविले व कोल्हापूर संस्थानात शेती-शाळा सुरु केल्या व शेतक-यांना आधुनिक शेतीची माहिती व्हावी म्हणून लॉर्ड आयर्विन अॅग्रीकल्चरल म्युझियम दिनांक १९-११-१९२९ रोजी सुरु केले.[५] शेतीमध्ये सुधारणा केल्यातरी प्रामुख्याने शेती

करणारा शेतकरी हा त्याकाळी सावकारी कर्जामध्ये अडकलेला होता म्हणून राजाराम महाराजांनी अशा शेतक-यांना दिलासा देणारा कर्जमुक्ती कायदा १९३९ ला मंजूर केला. या कायद्याच्या तरतूदीप्रमाणे एक लवाद कोर्ट नेमून सावकार व कर्जदार याच्याशी प्रत्यक्ष तडजोड करून सावकाराने दिलेले योग्य तेच कर्ज सावकारास देऊन कर्जासंबंधी सावकाराने तयार केलेली सर्व कागदपत्रे सर्वांसमोर नष्ट करून शेतक-यांना सावकारी कर्जातून सोडविण्याचे कार्य या कायद्याने केले.[६] तसेच या वेळी कोल्हापूर संस्थानच्या सहकार खात्याचे रजिस्ट्रार म्हणून श्री. श. शिर्के हे काम पहात होते. त्यांनी लिहिलेल्या एका आठवणीत ते सांगतात की --

"कोडगाव येथील एका शेतक-याने लग्नासाठी १९०५ साली २०० रुपये सावकाराकडून कर्ज घेतले होते. शेतकरी नियमितपणे कर्ज फेडण्याचा प्रयत्न करीत असे व अशा प्रकारे त्याने १९४० पर्यंत १२९० रुपये सावकारास कर्जफेडीपोटी दिलेले होते. इतकी रक्कम देऊन सुध्दा या शेतक-याचे कर्ज न फिटता त्याच्यावर १९९० रुपये येणे राहिले होते. राजाराम महाराजानी केलेल्या या कायद्याच्या आधारे सावकारास फक्त २०० रुपये देऊन या शेतक-याकडून लिहून घेतलेले सर्व दस्तऐवज फाडून टाकण्यात आले व अशाप्रकारे १९०५ ला सुरु झालेली सावकारी १९४० ला संपुष्टात आली.[७] याचबरोबर शेतक-यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देणा-या क्रेडिट सोसायटींची निर्मिती केली.[८] व अशा क्रेडिट सोसायटींची १९४० अखेर २८६ इतकी संख्या झालेली होती.[९]

३. सहकार चळवळ:

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर मध्ये १९१२ साली

सहकार चळवळ सुरु केली. १९२२ पर्यंत म्हणजेच शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंत ही चळवळ फारशी वाढली नाही परंतु यामुळे सामान्य लोकांमध्ये लोकजागृती घडून आलेली होती.[१०] राजाराम महाराजांनी खास करून या चळवळीकडे लक्ष दिले व या चळवळीमुळे शेतकरी सावकारी कर्जातून मुक्त होईल असे वाटल्यामुळे त्यांनी सहकार चळवळीचे लोन सर्व कोल्हापूरभर पसरविले. सन १९२१-२२ सालात कोल्हापूर संस्थानात ॲग्रीकल्चर सहकारी सोसायटया २६ तर नॉनॲग्रीकल्चर सोसायटया फक्त १२ होत्या.[११] परंतु राजाराम महाराजांनी स्वत: सहकारात लक्ष घातल्यामुळे २५ जानेवारी, १९२६ रोजी "बँक ऑफ कोल्हापूर"ची स्थापना झाली. बँकेस ठेवीच्या स्वरुपात महाराजांनी भरीव सहाय्य केले.[१२] अशा प्रकारे संस्थानामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था उभ्या राहिल्या. सन १९४० मध्ये कोल्हापूर संस्थानात पुढीलप्रमाणे सहकारी संस्था अस्तित्वात होत्या.

| | |
|---|---|
| १. ॲग्रीकल्चर सहकारी संस्था | २८८ |
| २. अर्बन सहकारी संस्था | २९ |
| ३. ग्राहक संस्था | ६ |
| ४. तालुका विकास संघ | ४ |
| ५. उत्पादक सहकारी खरेदी विक्री संस्था | १ |
| ६. इतर सहकारी संस्था | १५ |

अशाप्रकारे संस्थान भर सहकारी संस्थांचे जाळे पसरले. व त्यातून शेतकऱ्यांना कमी दराने कर्ज उपलब्ध होऊ लागले. व त्यांची सावकारी पाशातून सुटका होऊ लागली.

४. अस्पृश्यता निर्मूलन कार्य:

शाहू महाराजांनी सुरु केलेले अस्पृश्यता निवारणाचे कार्य राजाराम महाराजांनी आपले प्रमुख कार्य म्हणूनच पुढे चालू ठेवलेले होते. १६-१०-१९२२ रोजी कोल्हापूर येथे आण्णासाहेब लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत लोकांची मोठी परिषद झाली. या परिषदेमध्ये राजाराम महाराजांना मानपत्र देण्यात आले. त्यावेळी त्यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात सांगितले की, "बहिष्कृत समाजाच्या उन्नतीचे पवित्र कार्य माझ्या पिताजीप्रमाणे चालविण्याचा माझा इरादा आहे. तसेच आपला समाज आणि त्यांचे हितचिंतक यांनी आपले प्रयत्न अखंड चालू ठेवल्यास मानव प्राण्यासंबंधी आपल्या देशात वापरला जाणारा "अस्पृश्य" किंवा "बहिष्कृत" हा निंद्य शब्दप्रयोग आता फारकाळ राहू शकणार नाही. याची खात्री बाळगा."[१४] यावरून राजाराम महाराजांचे अस्पृश्यांबद्दलचे धोरण स्पष्ट होते. शाहू महाराजांनी दलितांना संस्थानातील नोकऱ्यात हुद्दयाच्या जागा दिल्या. कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यता कायदा करून नष्ट केली होती. सार्वजनिक विहिरी, पाणवठे, तळी. ही सर्वांना खुली केली होती. अस्पृश्यांच्या वेठ-वरळा पध्दतीला प्रतिबंध केलेला होता. महारकी वतन हे महारांना रयतावा करून दिलेले होते. सर्वजाती धर्मांच्या मुलांच्या शाळा एकत्रित केलेल्या होत्या. या सर्व सुधारणांच्या अंमलबजावणीची जबाबदारी राजाराम महाराजांनी पार पाडलेली आहे. कोल्हापूर संस्थानातील मांग लोकांना गावातील पोलीसपाटलाकडे हजेरी द्यावी लागे. शाहू महाराजांनी ही पध्दत बंद केली होती. परंतु राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत ती परत चालू झाली. राजाराम महाराजांच्या हे लक्षात

येताच ही अमानुष पध्दत बंद करण्याचा आदेश दिला व पोलीस पाटलांना तसे न करण्याबद्दल समज देण्यात आली.[१५] राजवाडयावर खास निमंत्रितांसाठी काही कार्यक्रम आयोजित करण्यात येत असत. अशा कार्यक्रमाना राजाराम महाराज अस्पृश्य बांधवाना मुद्दाम निमंत्रित करीत, व त्यांना माणाने वागविले जाई.[१६] सत्त्यशोधक समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सहभोजनाच्या कार्यक्रमास महाराज स्वत: हजर राहत व सहभोसजनाच्या कार्यक्रमाना प्रोत्साहन देत असत.[१७] अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नव्हता. सत्त्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न करीत होते. यावेळी राजाराम महाराजांनी करवीर गॅझेट दिनांक २९-९-१९३२ मधून एक जाहिरनामा प्रसिध्द केला व त्यात असे म्हंटले की —

"यापुढे करवीर इलाख्यात कोणत्याही जातीस "अस्पृश्य" ही संज्ञा वापरण्याचे कारण नसून सर्व हिंदूमात्र हे स्पृश्य हिंदूच मानले जातील. देवालयात जाणे, अगर सार्वजनिक चाव्या, विहिरी, तलाव, धर्मशाळा, वगैरेचा उपयोग करण्यास सर्वांना सारखेच हक्क राहतील. याप्रमाणे पुढे अबाधित वहिवाट राहण्यास करवीर राज्यातील प्रजाजनांकडून कोणत्याही प्रकारचा विरोध होणार नाही. असा श्रीमंत महाराज छत्रपतीसाहेब सरकार करवीर यास भरवसा वाटत आहे."[१८] अशाप्रकारे राजाराम महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यात, शाहू महाराजांच्या प्रमाणेच आघाडीवर राहून कार्य केलेले आहे.

### ५. आरोग्यविषयक सुधारणा:

छ. राजाराम महाराजांनी आपल्या प्रजेसाठी वारंवार आरोग्याच्या सुविधा पुरविल्याचे दिसून येते. त्याकाळात येणाऱ्या साथीच्या रोगांना

लोक बळी पडत असत. नोव्हेंबर १९२८ मध्ये प्लेगची साथ सुरु झाली. यावेळी सातारा जिल्हयात प्लेगमुळे तीन हजार लोक मरण पावले. परंतु कोल्हापूर संस्थानच्या चांगल्या आरोग्यविषयक धोरणांमुळे व ग्रामीण विभागात सुरु केलेल्या कामामुळे ही साथ संस्थानात पसरली नाही. सर्वत्र मोफत इनाक्युलेशनची सोय करण्यात आली. व या साथीवर पूर्ण नियंत्रण मिळवले.[१९] शहरांमधून दवाखान्याची सोय होती परंतु ग्रामीण विभागात औषधपाण्याची सोय होत नव्हती. यासाठी कोल्हापूर दरबारने ग्रामीण विभागात औषधोपचार व्हावेत यासाठी दि. १३-७-१९२९ रोजी कोल्हापूर दरबार गॅझेटमधून जो जाहिरनामा प्रसिध्द केला तो पुढीलप्रमाणे होता.

१. गावामध्ये खाजगी दवाखाना निघेल अगर अस्तित्वात असेल त्यास पंचायतीचे शिफारशीवरुन मदत करण्यात येईल.

२. धंदेवाले डॉक्टर अगर वैद्य यांच्यावर पंचायतीचा विश्वास असेल तर त्यांना ग्रँट देण्यात येईल.

३. मोफत रोग्यांचे रजिस्टर डॉक्टरांनी ठेवावे.

४. डॉक्टर किंवा वैद्य ज्या गावी नसेल त्या गावी तेथील रहिवाशां-पैकी कोणी सुशिक्षित गृहस्थ औषधउपचाराचे काम करणार असेल आणि पंचांची शिफारस असेल त्यालाही योग्य ती मदत मिळेल.

५. वरील बाबीसाठी योग्यती ग्रँट देण्यात येईल.

या जाहिरनाम्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या औषधउपचाराची सोय होण्यास मदत झाली.[२०]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

६. अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य:

धार्मिक अंधश्रध्देबाबत राजाराम महाराजांनी वारंवार काही हुकूम काढून त्याची अंमलबजावणी केलेली आहे. महाराजांच्या काळात देवाला रेडा बळी देण्याची पध्दत होती व त्यास रेडेजत्रा असे म्हणत. ही जत्रा राजाराम महाराजांनी १९३२ मध्ये हुकूम काढून बंद केली. यावेळी अनेकांनी महाराजांना धार्मिक बाबतीत लक्ष घालू नका म्हणून सांगितले परंतु राजाराम महाराजांनी या हुकुमाची योग्यती अंमलबजावणी करून अशाप्रकारची जत्रा संस्थानातून कायमची बंद केली.[२१] कोल्हापूर संस्थानात देवाला मुरळया व जोगतीनी म्हणून मुलींना सोडण्याचा प्रकार चालत असे. परंतु शाहू महाराजांच्या कारकिर्दीत मुरळया व जोगतीनी सोडण्याच्या विरूध्द "जोगत्या मुरळया प्रतिबंध कायदा" करण्यात आला होता.[२२] राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत अशाप्रकारच्या कायद्यांची अंमलबजावणी योग्य होते की नाही याबद्दल दक्षता घेतली जात असे. तसेच कोल्हापूर संस्थानात होळीच्या सणात स्त्रियांना उद्देशून घाणेरडी व बीभत्स भाषा वापरण्यात येत होती ही चाल सामाजिक प्रगतीच्या दृष्टीकोणातून चालू ठेवणे इष्ट नव्हते. म्हणून अशा प्रकारची चाल पूर्ण बंद करावी व कोणीही अश्लील भाषा वापरु नये. शिवाय रंगपंचमीच्या दिवशी रस्त्यावर रंग खेळू नयेत यासाठी तारीख २१-३-१९२१ रोजी एक जाहिरनामा प्रसिध्द झाला होता परंतु त्याचा अंमल योग्य होत नसल्याने डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी हा जाहिरनामा पुन्हा प्रसिध्दीस दिला व या प्रमाणे नियमाचे जो उलंघन करील त्यास कायद्या-प्रमाणे शिक्षा देण्याची तजवीज करण्यात आली.[२३] यावरून अंधश्रध्दा, तसेच कालबाह्य रूढी व परंपरा नष्ट करण्याच्या कामात छत्रपती राजाराम महाराज सक्रिय मदत करत होते हे दिसून येते.

७. राजाराम महाराजांचे शैक्षणिक कार्य:

राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक प्रगती घडून आली व सर्व महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजामध्ये शैक्षणिक जागृती निर्माण झाली. कारण शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणांमुळे कोल्हापूरला संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थी येऊ लागले. राजाराम महाराजांनी फक्त कोल्हापूर संस्थानातील विद्यार्थ्यांनाच शिक्षणाच्या सुविधा मर्यादित न ठेवता त्या सर्वांनांच दिलेल्या होत्या. त्यामुळे कोल्हापूर हे एक प्रमुख शिक्षणकेंद्र झालेले होते. शाहू महाराजांनी १९१७ साली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला व त्यांचा १९२२ सालीच मृत्यु झाला ही घटना लक्षात घेता राजाराम महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याच्या कायद्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते. कारण या कायद्याची सर्वती अंमलबजावणीची जबाबदारी छत्रपती राजाराम महाराजांवरच शाहूंच्या अकाली निधनाने पडलेली होती आणि खरोखरच ही जबाबदारी राजाराम महाराजांनी पूर्ण केलेली दिसून येते. कारण १९२१-२२ साली कोल्हापूर संस्थानात ५५९ प्राथमिक शाळा होत्या व त्यात ३१,०९६ विद्यार्थी शिकत होते. मदत शाळा ११ होत्या व त्यात ४९४ विद्यार्थी शिक्षण घेत होते, ७ रात्र शाळांमध्ये १०४ विद्यार्थी शिकत होते. मुलींसाठी ३३ शाळा होत्या व त्यात १९३८ मुली शिक्षण घेत होत्या, तसेच संस्थानामध्ये असलेल्या ५ उर्दूशाळांमधून ३०३ विद्यार्थी शिक्षण घेत होते.[२४] संस्थानात ३६ माध्यमिक शाळा होत्या व त्यामध्ये २१३८ विद्यार्थी शिक्षण घेत होते.[२५] राजाराम कॉलेजमध्ये १७३ विद्यार्थी शिकत होते. त्यातील

ब्राह्मण जातीच्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ६२.५० होती तर ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची टक्केवारी ३५.२० इतकी होती.[२६] याचप्रमाणे जयसिंगराव घाटगे टेक्निकल स्कूलमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४४ इतकी होती.[२७] परंतु १९४०-४१ साली या सर्व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेता राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरची शैक्षणिक प्रगती चांगली झाली होती हे दिसून येते. १९४०-४१ साली कोल्हापूर संस्थानची लोकसंख्या १०,९२,०४६ इतकी होती. या लोकसंख्येपैकी १,३७,९०३ इतके लोक शिक्षित झाले होते व त्यातील १८,३०८ इतक्या स्त्रिया शिक्षित झाल्या होत्या. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात १२.६२ टक्के लोक शिक्षित झाले होते.[२८] हे प्रमाण सर्व महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगले होते. १९४०-४१ साली कोल्हापूर संस्थानात असलेल्या शिक्षणसंस्था व त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुढील प्रमाणे होती.[२९]

| शिक्षण संस्थेचा प्रकार | एकूण शिक्षण संस्थांची संख्या | शिकत असलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| १. महाविद्यालय | ३ | १,१३८ |
| २. माध्यमिक शाळा | १३ | ३,३३७ |
| ३. ॲंग्लो व्हर्नॅक्युलर शाळा | ३० | १,६९२ |
| ४. प्राथमिक शाळा | ८०४ | ५४,७२४ |
| ५. धार्मिक व तंत्र शिक्षण देणाऱ्या शाळा | १७ | १,६२५ |
| ६. प्राथमिक मुलींच्या शाळा | ७१ | ४,४४९ |

यावरून १९२२ ते १९४० अखेर म्हणजे राजाराम महाराजांच्या काळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे कोल्हापूर संस्थानात सामान्य जनतेमध्ये सामाजिक व राजकीय जाणीवा निर्माण होऊ लागल्या होत्या. या सर्व शिक्षण संस्थामध्ये ६२ अस्पृश्य समाजातील शिक्षक काम करीत होते. तसेच डेप्युटी एज्यूकेशनल इन्स्पेक्टर या हुद्याच्या जाग्यावर अस्पृश्य अधिकाऱ्याची नेमणूक केलेली होती. तसेच अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या १९३९-४० साली ४,४१४ इतकी होती.[30] शिक्षण प्रसाराच्या बाबतीत राजाराम महाराज अतिशय दक्ष होते. कारण डिसेंबर १९२५ मध्ये अमरावती येथे झालेल्या अखिल भारतीय ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना राजाराम महाराज म्हणाले की --

"आतापर्यंत सामाजिक सुधारणेचा अर्थ फारच आकुंचित करण्यात आला आहे. आर्थिक परिस्थितीशी सामाजिक सुधारणेचा निकट संबंध आहे याची जाणीव फारच थोडया लोकांना असू शकेल. पण विचारांती आर्थिक परिस्थितीवरच सामाजिक कार्य अवलंबून असल्याचे दिसून येते. कारण आर्थिक उन्नती झाल्याशिवाय जनतेत शैक्षणिक प्रगती होणार नाही आणि शैक्षणिक सुधारणा झाल्याविना सामाजिक कार्याचे ध्येय गाठता येणार नाही."[31] या विधानावरून राजाराम महाराजांचे शैक्षणिक सुधारणेच्या बाबतीत असलेले विचार समजून येतात. डिसेंबर १९३४ साली राजाराम कॉलेजच्या वार्षिक समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून सांगली संस्थानचे राजेसाहेब आले होते. त्यावेळी त्यांनी कोल्हापूरमध्ये झालेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल प्रशंसा केली. त्यावेळी ते म्हणाले की --

"राजाराम कॉलेज म्हणजे कोल्हापूर दरबारच्या शिक्षणविषयक कामगिरीचे मूर्तीमंत दृष्य आहे. हे कॉलेज म्हणजे थोर पुरुष निर्माण करणारी

संस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या कॉलेजने कोल्हापूरला शैक्षणिक चळवळीचे केंद्रस्थान बनविलेले आहे. नुकतेच स्थापन झालेले "साइक्स लॉ कॉलेज" व "टिचर्स ट्रेनिंग कॉलेज", ही या भागात अत्यंत उपयुक्त कामगिरी करीत आहेत यात शंका नाही. माझी खात्री आहे की, महाराजसाहेबांच्या उदार धोरणामुळे कोल्हापूर येथे विश्वविद्यालय स्थापन होऊन कोल्हापूर हे शैक्षणिक बाबतीत दक्षिण काशी होऊन जाईल."[३२] सांगलीच्या महाराजांच्या भाषणावरून राजाराम महाराजांच्या काळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीचे महत्व लक्षात येते. कोल्हापूर संस्थानाने दिलेल्या शैक्षणिक सवलती व सुविधा या फक्त कोल्हापूर संस्थानापुरत्याच मर्यादित न ठेवता संस्थानाबाहेरील सर्वांनाच या सुविधा व सवलतींचा लाभ उठविता यावा असे भेदभाव विरहित धोरण राजाराम महाराजांनी अवलंबिलेले होते. यासर्व शैक्षणिक सवलतींचा व सोयींचा फायदा ब्राह्मणेतर समाजामध्ये शैक्षणिक प्रगती होण्यात झाला. याचे सर्व श्रेय राजाराम महाराजांच्या शैक्षणिक सुधारणेलाच द्यावे लागेल.

९. <u>कोल्हापूरातील बालवीर चळवळ:</u>

शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर मध्ये बालवीर चळवळ सुरु झाली. शाहू महाराजांना या चळवळीबद्दल आकर्षण वाटत होते. म्हणून त्यांनी १९२० साली ही चळवळ कोल्हापूरमध्ये सुरु केली. १९१८ साली प्रो. सोहोनी, भिलवडीकर व तोफखाने इ. मंडळींनी कोल्हापूरमध्ये "स्काऊट क्लब" नावाच्या एका संघाची स्थापना केली होती. या संघात तीस तरुण शिक्षण घेत होते. यावेळी नुकतेच पहिले महायुध्द संपले होते. त्यामुळे लष्कराचे प्रशिक्षण दिल्यासारखे वाटणारी ही चळवळ लोकांना रिक्रूट भरतीचाच

प्रकार वाटत होता.[33] परंतु राजर्षी शाहू महाराजांना या चळवळीचे आकर्षण वाटत असल्यामुळे त्यांनी या चळवळीचे उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रथम विनायकराव घोरपडे नावाच्या इसमास विलायतेला पाठविले. इंग्लंड मध्ये स्काउट चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या नेतृत्वाखाली गीलवेल पार्क येथे स्काउटचे शिक्षण देणारा कॅम्प सुरु होता. विनायकराव घोरपडे यांनी या कॅम्प मध्ये प्रवेश मिळविला. या कॅम्पमध्ये स्काउटचे उच्चशिक्षण संपादन करुन विनायकराव घोरपडे स्वदेशी परत आले. राजाराम महाराजांनी विनायकराव घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली तीनशे उत्साही विद्यार्थ्यांची काही पथके निर्माण केली व या पथकांत सहभागी झालेल्या सर्व बालवीरांना मोफत पोषाख दिला होता. लोकांना या चळवळी बद्दल आश्चर्य व कुतुहल वाटत होते. तथापि छत्रपती राजाराम महाराजांनी या बालवीरांच्यामार्फत समाजात लोकजागृती करण्याचे काम सुरु केले होते. पहिला स्काउट मास्टर ट्रेनिंग कॅम्प १९२३ साली राजाराम महाराजांनी मिलर साहेबांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर शहरापासून चार मैलावर असलेल्या रजपूतवाडी या ठिकाणी घेतला. या कॅंपसाठी शहरातील शिक्षक व तीस तरुण हजर होते. या ट्रेनिंग कॅम्पसाठी आलेले मिलरसाहेब हे मुंबई इलाख्यातील स्काउट चळवळीचे मुख्य अधिकारी होते. हा कॅम्प १० दिवस चालला. या दहा दिवसात त्यांनी प्रशिक्षण देऊन चांगले स्काउटशिक्षक निर्माण केले. त्यांचा दिक्षाविधी छ. राजाराम महाराजांच्या हस्ते झाला. या चळवळीत असलेले विनायकराव घोरपडे यांनी त्यांच्या घरगुती अडचणीमुळे स्काउटचे काम सोडून दिले. त्यांच्या जागेवर दरबारने व्ही.एस्. अय्यर, बी.ए., यांची पगारावर नेमणूक केली. मि. अय्यर यांनी स्काउटचे शिक्षण, मद्रास येथे डॉ. ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या तीनशे लोकांच्या पथकामध्ये पूर्ण केले होते. तसेच

व्ही.एस्. अय्यर, स्काऊट ऑर्गनायझर, यांनी या चळवळीचा संस्थानात सर्वत्र मोठया प्रमाणात प्रसार व्हावा म्हणून "बॉय स्काऊट असोशिएशन कोल्हापूर स्टेट" या नावाची एक मध्यवर्ती संस्था स्थापन केली. तसेच संस्थेचे एक कार्यकारिणीमंडळ नेमले व या मंडळाचे अध्यक्षस्थान राजाराम कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्याकडे देण्यात आले होते. या चळवळीने कोल्हापूर संस्थानात युवकांमध्ये जागृती घडून येण्यास मदत झाली. राजाराम महाराजांनी या संस्थेच्या उत्कर्षासाठी सोनतळी येथील बंगला, फर्निचर, स्काऊट ऑर्गनायझरचा पगार, व खर्चासाठी वर्षाला १६०० रुपये अनुदान दिले.[३४]

राष्ट्राच्या तरुणपीढीमध्ये बंधुभाव वाढावा तरुणांची शारिरिक वृध्दी व्हावी, बौध्दिक विकास व्हावा, सत्यप्रियता व कार्यतत्परता अंगी बाणावीत ह्या स्काऊटच्या प्रमुख तत्वांचा कोल्हापूरच्या बालवीरांमध्ये प्रसार झाला होता. त्यामुळे या स्काऊट बालवीरांनी संस्थानात लोकजागृतीचे कार्य केले. सन १९२५-२६ मध्ये ग्रामीण भागामध्ये स्काऊट चळवळींचा प्रभाव वाढू लागला यावेळी स्काऊट संघटनेत ६२५ बालवीर सहभागी झाले होते.[३५] तर १९३३ अखेर या चळवळीत १६०० च्यावर बालवीर काम करीत होते.[३६] राजाराम महाराजांनी दिलेल्या उदार आश्रयामुळे ही चळवळ कोल्हापूर मध्ये वाढली गेली व त्यामुळे समाजात राष्ट्रप्रेम निर्माण झाले.

## राजाराम महाराजांच्या राजकीय सुधारणा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणत असत की --"माझी प्रजा तीसरीपर्यंत जरी शिकून तयार झाली तर मी आनंदाने राज्य त्यांच्या स्वाधिन करीन"[३७] आणि खरोखरच या म्हणण्याप्रमाणे प्रजेला शिक्षण

मिळावे यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारा कायदा केला व शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न केले. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढलेले होते. राजाराम महाराज स्वत: उदारमतवादी असल्यामुळे त्यांना संस्थानातील जनतेला राजकीय सुधारणा याव्यात असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या संस्थानात स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती केली व त्याचा कारभार प्रत्यक्ष जनतेच्या हातात दिला. यासाठी कोल्हापूर स्टेट म्युनिसिपालिटी अॅक्ट सन १९२५ दुरूस्त करून लागू केला, व कोल्हापूर नगरपालिकेचा कारभार जनतेच्या ताब्यात दिला. तसेच पंचायत संस्थानचा कायदा करून इलाखा पंचायत, तालुका पंचायत व ग्राम पंचायत अशा स्वरूपाच्या सर्व थरावर स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती केली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

१. कोल्हापूर स्टेट म्युनिसिपालिटी अॅक्ट १९२५.

कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना १८८९ साली झाली. त्यावेळी नगरपालिकेचे सर्व सभासद सरकारकडून नेमले जात होते. परंतु या व्यवस्थेमध्ये काही दोष आढळल्यामुळे ही नगरपालिका बरखास्त करून तिचे ऐवजी कोल्हापूर संस्थान सरकारने "म्युनिसिपल सुपरिटेंडेंट" म्हणून एकच अधिकारी नेमूण त्याच्यामार्फत सर्व कारभार होऊ लागला. शाहू महाराजांनी जनतेला राजकीय हक्क मिळावेत व त्यांचा राजकारभारात सहभाग व्हावा म्हणून १९२० साली प्रचलीत असलेल्या नियमांप्रमाणे म्युनिसिपालिटीची घटना करण्यात आली व म्युनिसिपालिटीचे सर्व सभासद निरनिराळ्या जातीच्या मतदार संघातून निवडून देण्याची तरतूद करण्यात आली. परंतु या लोक

नियुक्त प्रतिनिधींचा कारभार व्यवस्थित होत नाही या सबबीवर १५-१२-१९२४ रोजी म्युनिसिपालिटी सस्पेंड करून पुन्हा कोल्हापूर दरबारच्या अधिका-यांमार्फत कारभार सुरु करण्यात आला.[३८] राजाराम महाराजांनी या गोष्टीकडे पुन्हा लक्ष दिले व जुन्या कायद्यात काही महत्वाचे बदल करून नवीन सुधारलेला सन १९२५ चा कोल्हापूर स्टेट म्युनिसिपालिटी ॲक्ट लागू करण्यात आला. या कायद्यातील प्रमुख कलमे खालील प्रमाणे होती.

१. म्युनिसिपालिटीमध्ये एकंदर सभासदांची संख्या ४० असावी आणि त्यात लोकांनी निवडलेले २० व सरकारने नेमलेले २० असे सभासदांचे प्रमाण ठरविण्यात आले. लोकांनी निवडलेल्या २० सभासदांपैकी दोन दलित वर्गातील असावेत त्यांची निवड त्यांच्याच मतदार संघातून होण्याची आहे.

२. करवीर इलाख्यातील सर्व म्युनिसिपालिटिच्या बाबतीत रावबहादुर सरसुभे हे कमिशनरचे अधिकार वापरणार असल्यामुळे म्युनिसिपालिटीचा "पोर्टफोलिओ" राव ब. दिवाण सरकार करवीर यांचे कडे राहणेचा आहे.

३. या कायद्यान्वये, या पुढे म्युनिसिपालिटीचा प्रेसिडेंट लोकनियुक्त व सरकार नियुक्त अशा सर्व सभासदांनी मिळून स्वत: निवडणेचा आहे. सरकारकडून नेमला जाणा-या प्रेसिडेंटच्या नेमणूकीचा प्रघात आता बंद करण्यात आला आहे.

४. जातवार संघ मोडून सर्व जातीधर्माचे एकत्र संघ स्थापणेत आले आहेत.

अशाप्रकारे या कायद्याने संस्थानातील नगरपालिकेचा कारभार हा प्रत्यक्ष जनतेच्या ताब्यात देण्यात आला.[३९]

२. पंचायत संस्थानचा कायदा सन १९२६:

ज्या प्रमाणे म्युनिसिपालिटीचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधी मार्फत करण्यात येऊ लागला त्याचप्रमाणे ग्रामीण विभागातील जनतेला स्थानिक स्वराज्याच्यावतीने राजकारभारात भाग घेता यावा म्हणून राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात पंचायत संस्थांचा कायदा लागू केला. या राजकीय सुधारणा मिळाव्यात म्हणून प्रजेची कोणत्याही प्रकारची मागणी नसतांना कोल्हापूरमध्ये हा कायदा अंमलात आणला आणि या कायद्यास कोल्हापूर इलाख्यातील पंचायत संस्थानचा कायदा, सन १९२६ असे संबोधण्यात आले. या पंचायत संस्थांचे इलाखा पंचायत, तालुका पंचायत, व ग्रामपंचायत असे तीन प्रकार करण्यात आले.

या कायद्यानुसार प्रत्येक तालुका पंचायतीचे १० ते १५ पर्यंत सभासद ठरविण्याचा अधिकार सरकारला असून पैकी निम्म्याहून कमी नाहीत इतके सभासद लोक नियुक्त व राहिलेले सरकार नियुक्त असतील तसेच इलाखा पंचायतीच्या सभासदांची संख्या २५ पासून ४० पर्यंत असेल व यातही निम्मे लोकनियुक्त व निम्मे सरकार नियुक्त सभासद राहतील अशी तरतूद करण्यात आली होती.

इलाखा पंचायत किंवा तालुका पंचायतीचे सभासद निवडण्यासाठी खालील पात्रता धारण करणाऱ्यांना मताचा अधिकार देण्यात आला होता.

इलाखा पंचायत व तालुका पंचायत सभासद निवडण्याबद्दल त्या त्या तालुक्यातील जे लोक, कमीत कमी १६ रुपये आकाराची जमीन स्वतःचे नावावर धारण करणारे खातेदार असतील तर त्यास व जे इसम व्हर्न्याक्युलर स्कूल फायनल, मुंबई सरकारची इंग्लीश स्कूल फायनल किंवा मुंबई युनिव्हर्सिटीची

मॅट्रिक्युलेशन अगर स्कूललिव्हिंग सर्टिफिकेट या पैकी कोणतीही एक परीक्षा पास असेल व तो, त्या पेटयाचा अगर महालाचारहिवाशी असेल त्यास त्या पेटयामध्ये अगर महालामध्ये मताचा अधिकार देण्यात आला होता. तसेच ग्राम पंचायतीमध्ये सभासद निवडण्यासाठी जो मनुष्य (स्त्री अथवा पुरुष) सदर गावातील चावडीत स्वत:च्या मालकीच्या जमिनीबद्दल दरसाल तीन आणे अगर जास्त लोकल फंड भरत असेल अगर जो मनुष्य आपल्या गावच्या ग्रामपंचायतीस घरफाळा अगर भूईभाडे याबद्दल दरसाल आठ आणे किंवा जास्त रक्कम देत असेल अगर जो इसम मराठी मुलकी किंवा मॅट्रिक परीक्षा पास असेल त्यास ग्रामपंचायतीचा सदस्य निवडण्यासाठी मतदानाचा हक्क देण्यात आला.[४५]

अशाप्रकारे राजाराम महाराजांनी आपल्या प्रजेला राजकीय सुधारणा दिल्या. याचा परिणाम कोल्हापूर संस्थानातील जनतेतून अधिक राजकीय हक्कांसाठी मागणी होऊ लागली व लोकांमध्ये राजकीय जागृती घडून आली.

.....

## संदर्भ व टीपा

१. दा.म.शिर्के, कोल्हापूरचा राज्यकारभार, व्हि.आ., १९३५, पृ.११४.

२. कित्ता, पृ.११५.

३. सत्यवादी : २० ऑक्टोबर १९३२.

४. कोल्हापूर ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२६-२७, पृ.३१.

५. कित्ता, १९२९-३०, पृ.२.

६. कित्ता, १९३८-३९, पृ.१२.

७. श्री.शां.शिर्के, कोल्हापूर संस्थानातील सहकार १९२७-४१, पृ.२९.

८. कोल्हापूर ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२६-२७, पृ.३१.

९. कित्ता, १९४०-४१, पृ.१००.

१०. कृ.ब.माने व आळतेकर यांचा लेख, सत्यवादी : १८ डिसेंबर १९३४.

११. कोल्हापूर ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२१-२२.

१२. कित्ता, १९२५-२६, पृ.३.

१३. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९४०-४१, पृ.१००.

१४. दा.म.शिर्के, उपरोक्त, पृ.६५.

१५. हंटर : ११ मे १९२८.

१६. श्रीधर हेरवाडे, छत्रपती राजाराम, पृ.८०.

१७. किता, पृ.८५.

१८. सत्यवादी : १ ऑक्टोबर १९३२.

१९. हंटर : ३० नोव्हेंबर १९२८.

२०. किता, १७ सप्टेंबर १९२९.

२१. श्रीधर हेरवाडे, उपरोक्त, पृ.८३.

२२. दा.म.शिर्के, उपरोक्त, पृ.३८.

२३. हंटर : ९ मार्च १९२८.

२४. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२१-२२, पृ.५२.

२५. किता, पृ.५६.

२६. किता, पृ.५६.

२७. किता, पृ.५६.

२८. किता, १९४०-४१, पृ.१४८.

२९. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९४०–४१, पृ.१४९.

३०. कित्ता, पृ.१४९.

३१. दा.म.शिर्के, उपरोक्त, पृ.१०९.

३२. सत्यवादी : १२ डिसेंबर १९३४.

३३. सत्यवादी : खास अंक, ३१ मे १९३३, पृ.८.

३४. हिं.दु.ताकुवे, यांचा लेख, सत्यवादी : ३१ मे १९३३.

३५. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२६–२६, पृ.६०.

३६. सत्यवादी : ३१ मे १९३३.

३७. डॉ.एस्.एस्.भोसले, (संपादक), राजर्षी शाहू काळ, विचार आणि कार्य, जिल्हापरिषद कोल्हापूर प्रकाशन, पृ.३३३.

३८. दा.म.शिर्के, उपरोक्त, पृ.९२.

३९. कित्ता, पृ.९३.

४०. कोल्हापूर अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, १९२५–२६, जनरल रिव्ह्यू, पृ.८.

४१. कित्ता, पृ.६२.